वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

२. पदोन्नती समिती सभा दि.०४ /१०/२०२४ चा सभावृत्तांत.

३. मा.आयुक्त सो यांचा दिनांक ०८/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/६७३/२०२४
दिनांक ०८/१०/२०२४

**विषय :- "लेखाधिकारी" पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **'लेखाधिकारी'** या अभिनामाची पदे पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ नुसार पदोन्नती क्षेत्रात येणारे लेखापाल हे विभागीय परिक्षा उत्तीर्ण झालेले नसून त्यांची वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक हा पदोन्नतीसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येवून, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार लेखापाल या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून, शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार खालील कर्मचा-यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन 'लेखाधिकारी' अभिनामाच्या रिक्त पदांवर पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सर्वानुमते शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | लिपिक लेखा संवर्ग पदाचे दि.३१/१२/२००३ अखेरची अंतिम स्वरुपाची सेवाज्येष्ठता तसेच दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती दर्शविणारा क्रम | अधिकारी नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग | सेवाज्येष्ठता क्रम |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ५ |
| १ | १३ | देशमुखे सुरेंद्र रामचंद्र | ज्येष्ठतेनुसार | १ |
| २ | २० | पासलकर अनिल जगन्नाथ | ज्येष्ठतेनुसार | २ |
| ३ | २१ | पासलकर अरुण गणपत | ज्येष्ठतेनुसार | ३ |
| ४ | - | जाधव प्रकाश ज्ञानोबा | ज्येष्ठतेनुसार (दिव्यांग) | ४ |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन उपरोक्त नमूद कर्मचा-यांना **'लेखाधिकारी'** या पदावर S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार आदेशाचे दिनांकापासून पदोन्नती देण्यास व सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या विभागामध्येच पदोन्नतीने पदस्थापना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त अधिका-यांकडे यापूर्वी सोपविलेले 'लेखाधिकारी' पदाचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज कायम ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्रस्तुतच्या पदोन्नत्या ह्या ज्येष्ठतेनुसार करण्यात येत असल्याने पदोन्नती करावयाच्या वरील अधिका-यांचे ज्येष्ठता क्रम हे स्तंभ ०५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

***सही/-***
***(शेखर सिंह)***
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत-

१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.